दिनांक : २१.०५.२०२१

# *लार्क ( संमिश्र अपंगत्व ) वार्षिक अहवाल २०२० -२०२१*

शाळेत एकूण विद्यार्थी २६, शिक्षक ५, ऑनररी शिक्षक १, मावशी ४ कार्यरत आहे.

कोवीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रार्दुभावामुळे सरकार नियमांनुसार विद्यार्थ्यासाठी शाळा बंद ठेवण्यात आली होती, जरी शाळा प्रत्यक्ष सुरू करणे शक्य झाले नाही तरी ऑनलाइन शाळा सुरू करण्यात आली होती.

ISO Google meet

- दि.२९.१०.२०२० रोजी Internal Audit झाले.
- दि. २२.१२.२०२० रोजी Surveillance Audit झाले.

फी

- कोविड-१९ या समस्येमुळे शैक्षणिक वर्षे २०२०-२०२१ साठी ची फी रू. ५३,००० /- ऐवजी रू. ४०,०००/- करण्यात आली होती.
- अनेक पालकांनी आपल्या पाल्यास हया संपूर्ण वर्षासाठी शाळेत पाठविणार नसल्याचे सांगितले आहे. तरी त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ साठी प्रवेश कायम ठेवण्यासाठी रू. ५०००/- फी भरण्यास सांगण्यात आले होते.

शिक्षक

- यावर्षी कोविड १९ समस्येमुळे २०२० - २०२१ यावर्षा साठी उरर्वरित शिक्षकांनी आपला रजेचा अर्ज दिला आहे.

अभ्यासक्रम

- सर्व विद्यार्थ्यांना ई-मेल व WhatsApp Online Group व्दारे अभ्यासक्रम व सूचना पाठविण्यात येत होत्या.
- विद्यार्थ्यांचे ABT सेशन्स विद्या भागवत यांनी घेतले.

उपक्रम

- दि. २१ जून २0२0 रोजी ऑनलाईन पध्दतीने योगा दिनाविषयी माहिती देवून व व्यायाम करण्यास सांगण्यात आले.
- टिळक पुण्यतिथी निमित्त पाढे स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.
- रक्षाबंधना निमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.
- १५ ऑगस्ट रोजी संस्थेत झेडावंदन करण्यात आले होते.
- दि. 0२ ऑटोंबर २0२0 रोजी महात्मा गांधी जयंती आणि भूतपुर्व प्रधानमंत्री लाल बहादुर शास्त्री जंयती निमित्त 'घरातील स्वच्छता' हा उपक्रम विद्यार्थ्यांना सांगण्यात आला होता. सर्वांनी छान प्रतिसाद दिला.
- दि. १५ऑक्टोंबर २0२0 रोजी भूतपुर्व राष्ट्रपती डॉ.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिना निम्मित्त वाचन दिन साजरा करण्यात आला.
- शाळेत खंडेनवमी निम्मित साहित्य पुजा करण्यात आली.
- दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन समूह गायन व कवायत प्रकार सादर करण्यात आले.
- दरवर्षी प्रमाणे 'आनंदमेळा' म्हणजेच आईस्क्रीम पार्टी दि. १९.0४.२0२१ रोजी Zoom link पाठवून सर्वांनी पार्टीचा आनंद घेतला.

स्नेहसंमेलन

- यावर्षी लार्क व एम.ओ.व्ही.एस या दोन्ही शाळेचे एकत्र स्नेहसंमेलन करण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी 'स्वप्नानंद' हा विषय ठरविण्यात आला होता.

  दि. 0२.0३.२0२१ रोजी काही कार्यक्रमांचे शाळेत shooting करण्यात आले. काही कार्यक्रमाचे video पालकांना करून पाठविण्यास सांगितले होते. त्यासाठी पालकांना शिक्षकांनी नाचाचे व्हिडीओ करून पाठविले होते.
- दि. २0.0३.२0२१ रोजी लार्क व एम.ओ.व्ही.एस च्या पालकांना स्नेहसंमेलनाची Zoom link पाठविण्यात आली होती. zoom link ला add होवून एकूण ५८ व्यक्तींनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. शाळेत शिक्षकांना सर्व स्नेहसंमेलन zoom link व्दारे प्रोजेक्टर वर दाखविण्यात आले.

परिक्षा

- तिमाही, सहामाही, नऊमाही व वार्षिक परिक्षा online पध्दतीने घेण्यात आली.
- परिक्षेचे निकाल WhatsApp व्दारे पालकांना पाठविण्यात आले. वार्षिक परिक्षेच्या निकालापूर्वी व्यक्तिगत व्हिडीओ कॉलव्दारे पालकांशी चर्चा करण्यात आली. वर्षभराच्या ऑनलाइन शिक्षणामुळे पालक समाधानी आहेत.
- महाराष्ट्र बोर्ड ओपन स्कूलचे इ. ५ वी चे रजिट्रेशन ३ विद्यार्थ्यांनी केले आहे.

बाहेरील स्पर्धा

- दि. ७ ऑक्टोंबर २0२0 रोजी सोहोम योग केद्रा तर्फे घेण्यात आलेल्या योग स्पर्धेत मुक्ताई कुलकर्णी आणि श्रध्दा कामेरीकर यांना वक्षीस मिळाले.

- रामरक्षा पाठांतर स्पर्धेत मुक्ताई कुलकर्णी आणि शर्वरी कुलकर्णी यांना अनुक्रमे पहिला आणि दुसरा क्रमांक मिळाला. या साठी पालकांनी स्वतंत्र प्रवेशिका पाठविल्या होत्या.
- उमेद परीवार तर्फे घेण्यात आलेल्या पणती रंगविणे स्पर्धेत शर्वरी कुलकर्णीला पहिला क्रमांक आला आहे.
- कर्न्सन इंडिया तर्फे ऑनलाईन चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत शाळेतील १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. निकेत जोशी या विद्यार्थ्याला बक्षिस मिळाले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनाही भेट वस्तू देण्यात आली होती.
- UPLEAP FOUNDATION PROJECT DAWN यांनी आयेजित केलेल्या नृत्य स्पर्धेत श्रध्दा कामेरिकरने सहभाग घेतला व तिला व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
- दि. २३.०४.२०२१ रोजी कर्न्सन इंडिया तर्फे "गोष्ट ऐका" या वर्कशॉप साठी प्रतिभा मुळे आणि ११ विद्यार्थी सहभागी झाले होते. पूर्वा बिबवे हया विद्यार्थिनीने "बुड बुड घागरी" ही गोष्ट सांगितली.

विद्यार्थी शाळा सोडण्याबाबत

- कोविड १९ च्या परिस्थितीमुळे पालक गावी राहण्यास गेल्यामुळे अर्णव गोळे या विद्यार्थ्याने शाळा सोडली.

पालक मिटिंग

- दि. ०९ व दि.१०.०९.२०२० रोजी पालकसभा शाळेमध्ये घेण्यात आली. १५ पालकांचे गट करून घेण्यात आली. यावेळी पालकांशी संचालिका हर्षा मुळे यांनी संवाद साधला.
- दि. ०८ व दि. ०९.०१.२०२१ रोजी ऑफलाईन व ऑनलाईन विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा घेण्यात आली. या पालक सभेत फेब्रुवारी महिन्यात शाळा सुरू करण्याबाबत पालकांशी चर्चा केली, त्याबाबत पालकांनी त्यांची मते लेखी स्वरूपात शाळेला कळविली आहेत. तसेच पालकांकडून Feedback form भरून घेण्यात आले.
- दि. ०१.०३.२०२१ रोजी zoom मिटिंग व्दारे स्नेहसंमेलना संदर्भात सभा घेण्यात आली.

स्वाती सगम
मुख्याध्यापिका
लार्क